दिव्यांगता विषयक साक्षरता संवर्धन कार्यक्रमाचे विकसन व त्याची परिणामकारकता : एक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखीय विद्याशाखेंतर्गत शिक्षणशास्त्र विषयातील पीएच.डी पदवीसाठी सदर केलेला संशोधन आराखडा

संशोधक

भोसले उमेश सुदामराव

मार्गदर्शक

डॉ . जोशी महेश माधवराव

एम .ए तत्त्वज्ञान,एम.एड,पीएच.डी शिक्षणशास्त्र

सहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

संशोधन केंद्र

शिक्षणशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

डिसेंबर २०१९

अनुक्रमणिका

अ.क्र.	प्रकरणीकरण	पान क्र.
१	प्रस्तावना	०३
२	संबंधित साहित्याचा आढावा	०७
३	संशोधनाची गरज	१४
४	संशोधनाचे महत्व	१५
५	संशोधन समस्या विधान	१५
६	संज्ञांच्या संकल्पनात्मक व कार्यात्मक व्याख्या	१५
७	संशोधनाची उद्दिष्टे व उप-उद्धिष्टे	१८
८	संशोधन परिकल्पना	१९
९	संशोधनाची व्याप्ती व मर्यादा	१९
१०	संशोधनाची मर्यादा	२०
११	संशोधन पद्धती	२०
१२	संशोधन नमुना निवड पद्धती	२१
१३	संशोधन अभिकल्प	२३
१४	संशोधांची साधने	२५
१५	सांख्यिकीय परिणामे	२६
१६	संशोधन कार्यवाहीचे टप्पे /रूपरेषा	२७
१७	प्रकार्णीकरण	२८
१८	संदर्भ ग्रंथ सूची	३०
१९	वेळापत्रक	३३

दिव्यांगता विषयक साक्षरता संवर्धन कार्यक्रमाचे विकसन व त्याची परिणामकारकता : एक अभ्यास

प्रस्तावना :-

आजचे युग हे लोकशाहीचे आहे. लोकशाहीत समाजातील सर्व व्यक्तींना समान संधी प्राप्त करून देण्याकडे शासनाचा रोख असतो.किबहुना लोकशाहीचे अधिष्ठान हे सर्व लोकांच्या हितावर अवलंबून असते. मुलामध्ये केवळ काही व्यंग आहे. म्हणून त्याला शिक्षणाची संधी मिळू नये हा सामाजिक अन्याय मानला जाईल. म्हणून दिव्यांग व्यक्तीला देखील त्याचा कुवतीनुसार प्रगती करून घेण्याची संधी मिळाली पाहिजे.

जन्मजात दिव्यांगत्व आणि अपघाताने ओढवलेल दिव्यांगत्व स्वीकारताना त्यात फरक पडतो विशेषतः आपल्या चुकीमुळे आपल्या मुलांना दिव्यांगत्व आलेला हे स्वीकारणं तर फारच जड जात . यात दोष अस कुणाचाच नसतोपण नात्याची घडी मात्र विस्कटू शकते. दिव्यांगत्व कायदा फारच तितका माहित नसल्यामुळे असा आघात पालक,समाज अन आपण सुद्धा त्या निष्पाप जीवावर नकळत केला जातो.

ज्या मुलामध्ये जन्मतः ,अपघाताने किंवा आजारपणामुळे दोष निर्माण झालेले असतात. त्यांना दिव्यांग समजले जाते. अपंग / दिव्यांग कायदा १९९५ यात अपंगाचे / दिव्यांगाचे एकूण पाच (०५) प्रकार सांगण्यात आले होते, परंतु दिव्यांग व्यक्तीचा कायदा २०१६ (Righst to Person With Disability- 2016) नुसार आत्ता दिव्यांगत्वाचे एकवीस (२१) प्रकारात वर्गीकरण करण्यात आले आहेत. पण आज सुद्धा दिव्यांग विषयक समाजात फार जनजागृती झाली नसल्यामुळे समाजात

फक्त पाचच दिव्यांगाचे प्रकार माहित आहेत. मुळात दिव्यांगत्वाचे दृश्य व अदृश्य असे प्रकार पडतात. दृश्य दिव्यांगात्व म्हणजे डोळ्यांना सहजपणे दिसणारे किंवा लवकर लक्षात येणारे, जसे कि अंध ,अस्थिव्यंग, अंशतः अंध असे सहजपणे चटकन लक्षात येतात व सहज ओळखता येते. अशा प्रकाराला दृश्य दिव्यांगत्व म्हणता येईल. कारण त्यांचा व्यंगामुळे डोळ्यांना ते सहज व चटकन लक्षात येतात. परंतु अदृश्य दिव्यांगत्व म्हणजे जे दिव्यांगत्व डोळ्यांना सहजपणे किंवा लवकर समजू शकत नाही,ओळखता येऊ शकत नाही. अशा प्रकाराला अदृश्य दिव्यांगत्व म्हणता येईल. जसे की कर्णबधीर, मुकबधीर, गतीमंध, अध्ययन असक्षम, अनुवंशिक आजार. इत्यादी आजार सहजपणे लवकर लक्षात येत नाही किंवा लवकर समाजात नाही किंवा ओळखण्यासाठी उशीर लागतो, अशा सौम्य दिव्यांगत्वाची तीव्रता कायम स्वरुपी दिव्यांगत्व अशा प्रकारच्या दिव्यांगत्व अदृश्य दिव्यांगत्व असे म्हणता येईल. दिव्यांगत्व म्हणजे जन्मतः, आजारपणामुळे , अपघात इत्यादी कारणाने शरीराचा अवयव ,कमी – अधिक होणे म्हणजे दिव्यांगत्व असे म्हणता येईल. तेच दिव्य शरीर / अंग म्हणजे दिव्यांगत्व असे ही उल्लेखता येईल.दिव्यांगत्वासाठी सर्व साधारणपणे विकलांग ,अक्षमता असणारे ,असमर्थता असणारे असे अनेक शब्द वापरले जातात .इंग्रजीमध्ये ही Impaired, disabled,Handicapped अशी संज्ञा दिव्यांगत्वासाठी वापरली जाते. WHO (World Health Organization) जागतिक आरोग्य परिषदेने दिव्यांगत्वासाठी वापरण्यात येणाऱ्या तीन संज्ञांमधील फरक स्पष्ट केला आहे? अक्षमता म्हणजे जन्माच्या वेळी किंवा अपघातामुळे झालेली कायमची वा तात्पुरती शारीरिक कमतरता . उदा. डोळ्याला जखम,पोलिओ झाल्याने आलेली

शारीरिक उणीव किंवा मेंदूला इजा झाल्याने आकलन / स्मरण शक्तीवर झालेला अनिष्ट परिणाम होय. वय, लिंग, शारीरिक ठेवण आणि व्यातीचे समाजातील स्वत:चे स्थान सांभाळताना सामाजिक व आर्थिक जवाबदारी पार पदवी लागते. ही जवाबदारी पार पडताना जो अडथळा येतो ते वैगुण्य किंवा असमर्थता होय. या गोष्टीही कायमच्या अथवा तात्पुरत्या स्वरुपातील असू शकतात .

कायमची अथवा तात्पुरती अक्षमता,चांगली आरोग्य सेवा किंवा वैयक्तिक साधने ,उपकरणे मिळाल्यानंतर दूर होऊन व्यक्ती प्रत्यक्षात काम करू शकते, आरोग्य प्राप्त करून देणारे औषधोपचार, आहार मिळल्यानंतर व्यक्ती परिस्थितीशी जुळवून घेतो. सामाजिक व मानसिक आधार मिळाल्यानंतर अशा व्यक्तीकडून होणारी प्रत्यक्ष कामगिरी किंवा कामाचे स्वरूप व दुर्बलतेमुळे कार्यक्षमतेवर होणारा परिणाम यामध्ये जी पोकळीची अवस्था असते ते दिव्यांगत्व असते. हे सर्व व असते. हे सत्य किंवा प्रामाणिक असून तरीही सामान्य समाज दिव्यां गाना एका वेगळ्याच दृष्टीने पाहतो, जसे कि काही मागील जन्मच पाप, कुकर्म व्यक्ती इत्यादी. विचाराचा विळखा त्यांच्या दिव्यां गाना देऊन जातात व समाजातील एक मागास, वंचित, दुर्लक्ष किंवा दिव्यांग व्यक्ती समाजाचा भागच नाही असे दाखवून देतात. दिव्यांगाकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टीकोन, बुरसटलेल्या संकल्पना , पूर्वग्रहदुषित आदी .घटकावर योग्य प्रकार अध्ययन करून या संकल्पना , विचार आणि दृष्टीकोन बदलण्यासाठी समाजाला दिव्यांगा विषयी साक्षरता करणे सद्य स्थितीला गरजेचे व अत्यावश्यक आहे.

सन २०११ च्या जन गणना या च्या अहवालानुसार सद्य स्थितीला (जन गणना २०११ नुसार) भारतातील एकूण लोकसंख्येपैकी लोक 2.21% अपंग/ दिव्यांग

आहेत. भारतातील पुरुष लोकसंख्येपैकी २.४१ % अपंग आहेत. तर भारतातील महिलांचे 2.01% लोक अपंग आहेत एकूणच 2 कोटी ६८ लाख अपंग व्यक्ती आहेत.भारतात अपंग/ दिव्यांग असलेल्या ४१% पेक्षा जास्त व्यक्तींचे कधीही लग्न होत नाही हे अपंगत्वाशी संबंधित असलेली समाजाची मागासलेली भूमिका आहे. अस्थिव्यंग (लोकोमोटर) आणि बहुविकलांग दिव्यांगत्व/ अपंगत्व सामान्यत: भारताच्या ग्रामीण भागात तर शहरी लोकांमध्ये भाषण आणि ऐकण्याची कमजोरी (कर्णबधीर, मुकबधीर अध्ययन क्षमता) अधिक प्रमाणात आढळून आले आहे. केवळ अपंग/ दिव्यांगत्व आहे. केवळ ३६.३% (सुमारे ९८ लाख) नोकरी करत आहेत त्यापैकी सुमारे ७१ लाख पुरुष कर्मचारी आणि २७ लाख महिला कर्मचारी आहेत. दिव्यांग /अपंग महिलांमध्ये साक्षरतेचे प्रमाण केवळ ४५ % आहे तर भारतातील एकूण साक्षरतेचे प्रमाण ६५ % आहे. अपंग पुरुषांचा साक्षरता दर ६२ % आहे. २७ % अपंग लोक शिक्षित आहेत. बौद्धिक अपंगत्व असलेल्या लोकांमध्ये हा आकडा ५७ % पर्यंत जातो. दिव्यांगत्व / अपंगत्व नसलेले ४४ % लोक बेरोजगार आहेत. याउलट, बौद्धिक अपंगत्व असलेल्या ७२ % लोक बेरोजगार आहेत. भारतातील केवळ ८ .५ % अपंग लोक पदवीवर पदवी संपादन करतात. असा अंदाज आहे की प्रशिक्षण कार्यक्रमांद्वारा योग्य कौशल्ये दिली गेली नाहीत तर २०२२ पर्यंत अपंग असलेल्या कार्यक्रमांद्वारा संख्या १० दशलक्ष ओलांडेल. दिव्यांग व्यक्तीच्या समस्याकडे दुर्लक्ष केल्यास समाजापासून ते मागास व वंचित राहालीत व त्यांच्या समस्या सोडविणे फार अवघड होऊन जाईल.‘हेलन केलर यांच्या विचाराप्रमाणे समाजातील दुर्बल व दिव्यांग व्यक्तीकडे दुर्लक्ष केल्यास अमूल्य शक्तीचा अपव्यय होऊ शकतो. त्यामुळे

दिव्यांग विषयक साक्षरता राबवविणे महत्त्वाचे वाटते'. त्यामुळे दिव्यांग व दिव्यांगत्वाची खरी ओळख ही समाजातून करण्याच्या उद्धिष्टाने संशोधकाने दिव्यांग विषयक साक्षरता संवर्धन कार्यक्रम व त्याची परिणामकारकता पाहण्यासाठी वा तपासण्यासाठी या विषयाचा प्रबंध हाती घेण्याचा विचार केला आहे.

संबंधित साहित्याचा आढावा :-

डयु .सी . मॅफेरसन ,किंग जी.हॉलंड .(२०१९) यांनी दिव्यांग तरुणासाठी भावनिक साक्षरता विकासासाठी सुविधा प्रधान निवासी विसर्जन जीवन कौशल्य कार्यक्रम उत्प्रेरक घटक (RILS) हे तंत्र विकसित करून दिव्यांग तरुणासाठी कशी करता येईल व त्याची जागरूकता विषयक घटक कसे उत्प्रेरक करता येईल या बाबीचा विचार घेतला आहे. प्रस्तुत संशोधनात २५ दिव्यांग तरुणाची मुलाखत घेऊन त्यांना २५ प्रश्न विचारण्यात आले होते. प्रस्तुत संशोधनात मिश्र संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. 1)आत्मविश्वास विकास घटक ,२) भावनिक नियमन आणि भावनिक प्रतिक्रियेत बदल ३) स्व विकास व आम्विश्यक घटक विकसित करणे. संशोधकाने RILS या तंत्राचा मदतीने समस्या सोडण्याचा प्रयत्न केला आहे. निष्कर्षात अस लेखक करतात कि समाजाला दिव्यांग विषयक भावनिक विकसन विषयक साक्षर करणे गरजेचे आहे.

एफ.रिलोटा ,पी.राघवेंद्र ए.(२०१८) यांनी दिव्यांगत्व जागरूकता आणि समावेशक ,शारीरिक शिक्षण वर्गा द्वारे बौद्धिक दिव्यांगत्व विध्यर्थाचा सकारात्मक दृष्टीकोन एक अभ्यास या विषयात संशोधन केले आहे.

प्रस्तुत संशोधनात बौद्धिक दिव्यांगत्व असलेल्या विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षण वर्गातून सामान्य व दिव्यांग विद्यार्थीचं योग्य सहसंबध प्रस्थापित करून खेळाचा माध्यमातून बौद्धिक दिव्यांगत्व असणारे यांचात विकास प्रस्थापित करण्याचा प्रयत्न यात करण्यात आला आहे तसेच सामान्य विद्यार्थांच्यात जागरूकता आणि सामान्य विद्यार्थांना याची ओळख व त्यांच्यात वर्तन विषयक अभ्यास कस व त्याची परिणामकारकता पाहण्यासाठी वय १२-१३ वयोगटातील विद्यार्थाची निवड केले आहे.शरीरिक शिक्षण वर्गातून बौद्धिक दिव्यांगत्व असणारे विद्यार्थ्याचा वर्तनात सामाजिक व भावनिक बदल होतो पण सामान्य विद्यार्थाच्यात जागरूकता करणे गरजेचे आहे. असाच सकारात्मक दृष्टीकोन बाळगल्यास विकास होतो. असे म्हणता येईल, असे निष्कर्षात मांडले आहे.

ज्योती (२००५) यांनी दिव्यांगत्व संबंधित चित्रपट आणि दिव्यांगत्व विद्यार्थाच्या साक्षरता कार्यक्रम एक अभ्यास प्रस्तुत संशोधनात संशोधकाने दिव्यांगता संबंधित विषयक चित्रपट आणि दिव्यांगता विषयक साक्षरता कार्यक्रम राबविण्यात आला. यात चित्रपटातील दिव्यांगता विषयक साक्षरता संकल्पना ,दिव्यांग विषयक लक्षणे ,व त्यावरील उपाय कसे व का करावे याच्या संदर्भात आहे. अश्या चित्रपटांना पुरस्कार प्राप्त होतो पण समाज मनोरंजन युक्त चित्रपट पाहतो व विसरून जातात व त्यावरील विचारसुद्धा करत नाही, याची शोकांतिका आहे. असे संशोधका म्हणते . प्रस्तुत संशोधन मिश्र संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. संशोधनात वर्ग ८ व वर्ग ९ यांच्यातील एकूण ४०० विद्यार्थाची निवड करण्यात आली होती. पूर्व व उत्तर चाचणी घेऊन निष्कर्षात संशोधकाने दिव्यांगता विषयक साक्षरता ,ओळख समाजाला करून देऊन दिव्यांगता विषयक

जागरूकता व साक्षरता विषयक कार्यक्रम / उपक्रम राबवविले पाहिजेत. एखादा मनोरंजनाचा भाग म्हणून पाहणे व विसरून जाणे असे करून चाल नर नाही. समाजाने पुढाकार घेणे तितकेच गरजेचे आहे.

जे.चामँड, आर ,स्केलेस (२०१५).यांनी दिव्यांग मुलाशी सामाजिक संवाद एक अभ्यास या विषयी संशोधन केले आहे प्रस्तुत संशोधंत संशोधकाने सामाजिक फक्त दिव्यांगता विषयक डाऊन सिंड्रोम असणाऱ्या मुलाशी संबंधित असणाऱ्या समस्यांच्या अभ्यास केला आहे यात या दिव्यांगत्वाची लक्षणे , करणे , प्रकार व ते कसे ओळखावे इत्यादी घटकाचा अभ्यास संशोधकाने वयोगट २४ महिने व ४७ महिने असणाऱ्या १५ बालकावर प्रयोग व निरीक्षण पद्धतीचा वापर केला आहे यात मिश्र संशोधन पद्धतीचा   विषयी सांगण्याचा प्रयत्न केला आहे. मुलावर प्रायोगिक पद्धतीचा वापर करून बालकाचा कार्य कौशल्य चाचणी विकसन करून त्यांचे मुल्यांकन ठरविण्यात आले आहे. व समाजात या विषयी जागृती करण्याची गरज आहे आहे. डाऊन सिंड्रोम विषयक जागृती करणे महत्त्वाचे गरजेचे आहे, असे निष्कर्षात मांडण्यात आले आहे.

टी,आयकोनो ,एन.हाएट .जे.स्तोन्गो .के,बँगली , ओ.लँडी . एम. आर्थर.सि.मँककिंस्टी आणि ए.गाँर्शीया.मेल्गर न्युफँसल (२०१४) यांनी सर्व समावेशक शैक्षणिक समायोजन विकास विषयक दृष्टीकोन एक अभ्यास या विषयी संशोधन केले आहे. प्रस्तुत संशोधनात संशोधकाने विषयी संशोधन शिक्षणाविषयी दृष्टीकोन मापिका याच्या संदर्भात प्राथमिक, माध्यमिक शिक्षणामध्ये दिव्यांग विद्यार्थाचा समायोजन कौशल्य आणि त्यांच्या विषयक जागरूकता करण्याचे कार्य संशोधनातून करण्यात आले आहेत. सर्व समावेशक शिक्षण व समायोजन यांचा

अभ्यास मिश्र संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. नमुना म्हणून १० विद्यार्थाची निवड करण्यात आली आहे. प्रस्तुत संशोधनात संशोधकाने दृष्टीकोन मापिकेचे मुल्याकन नुसार मापन केले असता, दिव्यांग व सामान्य व्यक्ती याच्यात सामाजिक घटक किती जवाबदार आहे हे सांगण्याचा प्रयत्न यात केला आहे.

सोनम बनसल,(२०१४) यांनी सर्व समावेशक आणि विशेष शाळेत अपंगत्व असलेल्या मुलामध्ये सुसंवाद आणि वर्गातील वागणुकीची भावना एकाकीपणावरील सह्योगात्मक शिक्षणाचा परिणाम या विषयावर संशोधन केले आहे. प्रस्तुत संशोधनात संशोधकाने सर्वसमावेशक आणि विशेष शाळेत दिव्यांगत्व असलेल्या मुलामध्ये सुसंवाद व त्यांच्यातील एकलकोंडा (एकटेपणा) दूर करण्यासाठी व वर्गातील वर्तनाचा परिणाम अभ्यासण्यासाठी प्रस्तुत संशोधनात वर्ग ३ ,वर्ग ४, वर्ग ५ व वर्ग ६ या विद्यार्थावर प्रायोगिक व सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला असून निष्कर्षात दिव्यांग विद्यार्थीचा सर्वसमावेशक सुसंवाद साधून त्यांचा एकाकीपणा दूर करण्यासाठी वर्गातील वातावरण व दिव्यांगा विषयी असणारे वर्तन बदल व जागरूकता करून त्यांचा एकाकीपणा दूर होण्यास मदत होईल .

विक्टर जॉन ,कॉर्डीरो.(२०१२) यांनी दिव्यांगता विषयक आव्हाने व प्रतिसाद या विषयी संशोधन केले आहे. प्रस्तुत संशोधनात कर्नाटक राज्यातील कनाकपुरा तालुक्यातील असणाऱ्या दिव्यांग व्यक्ती विषयक पुनर्वसन व त्यांच्या विषयीची समाजातील जागरूकता करण्याचा प्रयत्न या संशोधनातून करण्यात आला आहे. दिव्यांगांना समाजात कोण-कोणत्या प्रकारच्या समस्याना तोड द्यावे लागते व त्यांची समाजशास्त्री दृष्टीकोन कसा आहे व समाजाचे दिव्यांगांच्या पुनर्वसन

विषयक कसा प्रतिसाद आहे याचा अभ्यास केला आहे .प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग केला गेला आहे. प्रस्तुत संशोधनात संशोधकाने दिव्यांगता विषयक जागरूकता करणे व त्यांना समाजाच्या प्रवाहात आणणे व त्यांचा स्वीकार करणे गरजेचे आहे, असे निष्कर्षात मांडले आहे.

अनु. प्रसन्ना(२०१२)यांनी संयुक्त राष्ट्रसंघ याची दिव्यांगता विषयक अंमलबजावणी संदर्भ भारत या विषयी संशोधन केले आहे. प्रसूत संशोधनात संशोधकाने दिव्यांगता विषयक जनजागृती, साक्षरता यांच्या विषयी भारतात किती प्रमाणात जागरूकता आहे. हे पाहण्यासाठी संशोधकाने कायदे,करार व त्यांची अंमलबजावणी कशी असायला हवी या विषयी संशोधन केले आहे. प्रस्तुत संशोधनात मिश्र संशोधन पद्धतीचा वापर केले गेला आहे. संशोधकाने निष्कर्षात असे मांडले आहे कि समाज हा मुख्य घटक आहे. दिव्यांगाना सामावून घेणे ,त्यांचे शिक्षण ,कायदे व त्यांच्या विकासासंदर्भात असणारे घटक व विषयाचा अभ्यास पुन्हा नवीन पद्धतीने करणे व त्याची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

प्रस्तुत संशोधनात अनेक संदर्भ साहित्याचा व संशोधन शोध निंबंध ,वर्तमान पत्रातील लेखन साहित्य,मासिक इत्यादी साहित्याचा अभ्यास केला असता असे दिसून येते कि दिव्यांगता विषयक साक्षरता संवर्धन कार्यक्रमाचे व त्याची परिणामकारकता या विषयी किंवा यासारखे पाहण्यास मिळले नाही, परंतु दिव्यांगता साक्षरता अर्थात दिव्यांगता म्हणजे कोण ? दिव्यांगाचे प्रकार ,त्यांची लक्षणे , दिव्यांग होण्याची कारणे , त्यांना मिळणाऱ्या सेवा सुविधा विषयक समाजाला दिव्यांग विषयी किती प्रमाणात माहिती आहे. Hi माहिती संदर्भ साहित्याची केलेली चर्चा यातून समजते.

प्रस्तुत संदर्भीय साहित्याचा संशोधकाने समस्या विधान, संशोधनाची उद्दिष्टे व संशोधन साहित्य , सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे. व निष्कर्षा वरून असे सांगण्यात आले आहे कि दिव्यांगता विषयक साक्षरता संदर्भात समाज फार उदासीन पाहण्यास मिळतो ,त्यामुळे दिव्यांगाना पाहण्याचा किंवा त्यांच्या समस्या कडे फार गांभीर्याने पहिले जात नाही . दिव्यांगाच्या साम्य संदर्भात समाज यांनी अनेक प्रकारची निर्बंध लादले आहेत असे वाटते ,तर काही संशोधनात भारत सरकारला संयुक्त राष्ट्र संघाने ज्या प्रमाणात दिव्यांगता विषयक साक्षरता समाजाला योग्य प्रमाणात समजून सांगायला पाहिजेत त्या प्रमाणात सांगण्यात आलेले नाही. व त्याची अंमलबजावणी सुद्धा योग्य प्रमाणात करण्यात आलेले नाही .

वरील सर्व संबंधित साहित्याचा आढावा याची चर्चा केली असता असे स्पष्ट लक्षात येते कि समस्याच उदगम व संशोधन प्रश्न आपल्या समाजात दिव्यांगता विषयक फारशे तितक्या प्रमाणात विचार करण्यात आलेला नाही. समाजात फक्त चित्रपटाच्या माध्यमातून दिव्यांगत्वाच्या समस्या मांडतात व मनोरंजनाचा भाग म्हणून पाहतात तसेच पुरस्कार ही प्राप्त करतात पण मनोरंजन झाल्या वर विसरून ही जातात. फक्त त्या चित्रपटांना प्रसिद्धी प्राप्त होते, त्या दिव्यांग मुलाचा किंवा त्या समस्याच पाहिजे त्या प्रमाणात विचार केला जात नाही. असे स्पष्ट दिसून आले आहे . समाज असे करू लागला तर दिव्यांगाच्या समस्यांकडे कोण लक्ष देणार असे करणे समाजाला चालणार नाही .दिव्यांगाच्या समस्या या योग्य पद्धतीने हाताळल्या पाहिजेत जेणे करून त्यांचा पुनर्वसन झाला व समाजाच्या प्रवाहात त्यांना अनल जाईल याचा विचार केला गेला पाहिजे .

वरील सर्व संदर्भीय साहित्याचा विचार केला केला असता ,सदरील संशोधन विषय नवीन असल्याचे पाहण्यास मिळते त्यामुळे जूणे -नवीन साहित्याचे परिक्षण करणे व त्यातून संशोधन संदर्भ संशोधकाला दिव्यांगता विषयक साक्षरता करण्यासाठी शैक्षणिक संस्था महत्त्वाची भूमिका निभावत असल्याचे पाहण्यास मिळते , त्यामुळे याची सुरुवात शैक्षणिक संस्थांतून केली गेले पाहिजेत तेंव्हा कुठे ते समाजाला समजेल ,पटेल व त्यातून त्यांची मानसिकता बदलण्यासाठी दिव्यांगता विषयक साक्षरता संवर्धन कार्यक्रमाचे विकसन करणे महत्त्वाचे ठरेल असे वाटते. संशोधनाची उद्दिष्टे, , संशोधन पद्धती, नमुना निवड पद्धती ,या सारख्या सर्व घटकाचा विषयगर्भीय लक्षात घेऊन कसे सादरीकरण करावे याची प्रचीति संशोधकाला संशोधनात मदत होईल असे वाटते. या दृष्टीने पुढील प्रश्न संशोधन करण्यास प्रवृत्त करण्यास महत्त्वाचे ठरले .

१) महाविद्यालयीन स्तरावर दिव्यांगता विषयक साक्षरता केली जाते का?.

२) महाविद्यालय स्तरावर विद्यार्थ्यांना दिव्यांगत्व होणे/ येणे यामागील कारणे याची माहिती करून घेतात का ?

३) दिव्यांगता विषयक भारत सरकारने दिव्यांग व्यक्तीचा अधिकार – २०१६ (RPWD -2016) याच्या नुसार दिव्यांगाचे नवीन प्रकारची माहिती आहे का ?

४) महाविद्यालयात दिव्यांगत्वाचे प्रकार यांच्या विषयी साक्षरता कार्यक्रम व साक्षरता विकसन कार्यक्रम घेतले जातात का ?

५) दिव्यांगता विषयक साक्षरता, समस्या बाबत महाविद्यालय व समाज किती प्रमाणात गंभीर आहे.?

६) विद्यार्थीना दिव्यांगत्वाचे प्रकार यांच्या विषयी साक्षरता संवर्धन कार्यक्रमाचे विकसन कार्यक्रम राबवीता कोणत्या अडचणी येतात.?

७) दिव्यांगता विषयक साक्षरता संवर्धन कार्यक्रमा विषयी महाविद्यालयाची भूमिका तपासणे ?

संशोधनाची गरज :-

एखाद्या गोष्टीची माहिती व तिचा प्रसार करण्यासाठी अनेक तंत्र योजना किंवा प्रसारमाध्यम वापरतात व त्या गोष्टी बदल जनजागृती व साक्षरता केले जाते .परंतु दिव्यांग व्यक्ती विषयी समाजात योग्य त्या प्रमाणात किंवा योग्य त्या प्रकारे त्यांचा विषयी जागरूकता /साक्षरता विषयक उपक्रम विकसन करून समजला साक्षर करणे ही काळाची गरज सद्य स्थितीला झाली आहे. दिव्यांग होण्याची करणे ,लक्षणे ,हक्क ,अधिकार इत्यादी घटकाची योग्य प्रमाणात साक्षर व दिव्यांगता विषयक साक्षरता करण्यात यावे व त्यांचा विषयी साक्षरता करणे गरजेचे आहे. कारण समाजात दिव्यांग व्यक्तीचे वाढते प्रमाण व   दिव्यांगाना समाजाचा पाहण्याचा दृष्टीकोन बदलण्याची व दिव्यांगाना समाजाच्या मुख्य प्रवाहात तितकेच गरजेच आहे. दिव्यांग व्यक्ती विषयी समाजातील दृष्टीकोन बदलून त्यांचा आत्मविश्वास आणि शिक्षणाविषयी ,जीवनाविषयी आनंदाने जगता येईल अशी वातावरण निर्मिती करणे गरजेचे आहे .समाजातील कोणताही घटक मागे किंवा वंचित राहता कामानये या हेतूने दिव्यांगता विषयक साक्षरता समाजाला करणे सद्य स्थितीला गरजेचा आहे.

संशोधनाचे महत्व :-

भरतील दिव्यांग व्यक्तीचा अधिकार -२०१६(RPWD-2016)अधिनियमानुसार दिव्यांगत्वाचे एकूण २१ प्रकारात वर्गीकरण /प्रकारात करण्यात आले आहेत. पण समाजात जे डोळ्यांना स्पष्ट दिसत (दृश्य) असेच दिव्यांगता विषयक माहिती त्यांना प्राप्त आहे, पण जे डोळ्यांना दिसत नाही (अदृश्य) किंवा लवकर ,चटकन लक्षात येत नाही लक्षणे स्पष्ट ओळखता येत नाही अशा दिव्यांगत्व विषयक समाजाला व ज्यांना हे सुद्धा दिव्यांगाच्या प्रकारात वर्गात मोडतात हे त्यांना समजून सांगणे व समाजाला त्यांच्या विषयी समानतेची , सहकार्याची व त्यांना समजून घ्याव हे गरजच व अत्यावश्यक आहे. हे समाजाला समजून सांगणे गरजेचा आहे .महत्त्वाचे आहे दिव्यांगाना त्यांचा अधिकार ,हक्क ,सन्मान प्राप्त करून देणे ही आपली नैतिक जवाबदारी आहे.

संशोधन समस्या विधान :-

दिव्यांगता विषयक साक्षरता संवर्धन कार्यक्रमाचे विकसन व त्याची परिणामकारकता :एक अभ्यास

संज्ञांच्या कार्यात्मक व संकल्पनात्मक व्याख्या :-

संकल्पनात्मक व्याख्या :

१.दिव्यांग : जन्म जात दिव्य,अंग/शरीर असणारी व्यक्ती म्हणजे दिव्यांग होय.

मराठी शब्दकोश

२. दिव्यांग : दिव्य अंग/शरीर असणारी व्यक्ती म्हणजे दिव्यांग होय.

दिव्यांग व्यक्तीचा अधिकार -२०१६ (**RPWD**-2016)

३..दिव्यांगता **(Disability Person): -** Disabillty as a physical or mental condition that limits a persons of movement senses or activities.

-Merriam webster Dictionary

दिव्यांगता **(Disability Person)**: शारीरिक किंवा मानसिक स्थिती म्हणून केली जाते,जी एखाद्या व्यक्तीच्या हालचाली,इंद्रिय किंवा क्रियाकला यांना मर्यादित करते .

-Merriam webster Dictionary

कार्यात्मक व्याख्या :-

१.दिव्यांग व्यक्तीचा अधिकारात दिव्यांगत्वाचे २१ प्रकारातील (दृश्य) दिव्यांग म्हणून प्रस्तुत संशोधनात स्वीकारले आहे.

संकल्पनात्मक व्याख्या :

साक्षरता (**Literacy**): Literacy is an ability to identity understanding interpret, creat, communicate and compute using printed and written materials associated with verying contexts.

UNESCO'S, 2013.

साक्षरता (**Literacy**): साक्षरताही भिन्न संदर्भाची संबंधित मुद्रित आणि सामग्री वापरून ओळखण्याची,समजून घेण्याची अर्थ सांगण्याची व्याख्या तयार करण्याची, संप्रेषण करण्याची आणि मोजण्याची क्षमता आहे.

- UNESCO'S, 2013

संकल्पनात्मक व्याख्या :

कार्यक्रम विकसन (**Programme Development**) The process of producing or creating something new or more advanced,like a new or advanced product or idea.

-Definitions Dictionary.net.

कार्यक्रम विकसन: नवीन किंवा प्रगत उत्पादनाप्रमाणे काहीतरी नवीन किंवा अधिक प्रगत किंवा नवीन तयार करणे .

- Definitions Dictionary.net.

कार्यक्रम विकसन: कार्यक्रमाची रूपरेषा कशी असावी व त्या घटकाची माहिती कशी इतरांपर्यंत पोहोचविता येईल या बाबतीत /बाबी लक्ष ठेवून कार्यक्रम विकसन करणे.

कार्यात्मक व्याख्या :

कार्यक्रम विकसन : दिव्यांगत्व विषयक माहिती समाजाला करून देण्यासाठी राबविण्यात येणारी कार्याची रूपरेषा म्हणजेच कार्यक्रम विकसन असे म्हणता येईल .

संकल्पनात्मक व्याख्या :

परिणामकारकता (Effectivness): - Effectivness is the capability of producing a desined result or the ability to produce desired outputs.

- Online Dictionary.com

परिणामकारकता : परिणामकारकता म्हणजे इच्छित परिणाम उत्पादन करण्याची क्षमता

- शब्दकोश

कार्यात्मक व्याख्या :

परिणामकारकता : ज्या कारणासाठी उपक्रम राबवविला गेला त्यानुसार घडलेला बदल म्हणजे परिणामकारकता होय.

शब्दकोश

संशोधनाची उद्दिष्टे व उप-उद्दिष्टे :

१) दिव्यांगता विषयक साक्षरते संबंधी संकल्पना ,समजुती ,विचार व आवश्यकता यांचा शोध घेणे.

२) दिव्यांगता विषयक साक्षरतेच्या स्तराचे निश्चितीकरण करण्यासाठी दिव्यांगता विषयक साक्षरता चाचणीचे विकसन करणे.

३) दिव्यांगता विषयक साक्षरता संवर्धनासाठी कार्यक्रमाचे विकसन व कार्यान्वयन करणे.

अ) दिव्यांगता विषयक साक्षरता संवर्धनासाठी लक्ष्य गट निश्चित करणे.

ब) दिव्यांगता विषयक साक्षरता संवर्धनासाठी कार्यक्रमाचे घटक,आशय, संरचना निश्चित करणे.

क) लक्ष्य गटानुसार दिव्यांगता विषयक साक्षरता संवर्धन कार्यक्रमाचे अंतिम प्रारूपे तयार करणे.

४) दिव्यांगता विषयक साक्षरते च्या घटका संदर्भात परिणामकारकतेचे मूल्यमापन करणे

अ) दिव्यांगता विषयक साक्षरता संवर्धन संबंधी विविध घटक व चलाच्या संदर्भात मूल्यमापन करणे.

ब) दिव्यांगता विषयक साक्षरता संवर्धन संबधि विविध लक्ष्य गटासंदर्भात परिणामकारकतेचे मूल्यमापन करणे.

क) दिव्यांगता विषयक साक्षरतेच्या संवर्धनासाठी संबंधित विविध घटक व चलाच्या संदर्भात मूल्यमापन करणे.

संशोधन परिकल्पना :

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील मुख्य संशोधन परिकल्पना निश्चित करण्यात आली आहे.

१. दिव्यांगता विषयक साक्षरता संवर्धन कार्यक्रम परिणामकारक आहे.

वरील मुख्य संशोधन परिकल्पनेवर आधारित सांख्यिकीय व उपपरिकल्पनाची निश्चित करून माहिती विश्लेषण केले जाईल .

संशोधनाची व्याप्ती :

- प्रस्तुत संशोधनात नांदेड जिल्ह्याचा विचार करण्यात येईल.
- प्रस्तुत संशोधनात फक्त दृश्य दिव्यांगता (डोळ्यांना दिसणारे /सहजपणे लवकर लक्ष्यात येणारे उदा. अस्थिव्यंग,कर्णबधीर,अल्पदृष्टी,असिड-हल्ला,बुटकेपणा,वाचादोष,मानसिकआजार,बहुविकलांग,स्वःमग्नता, अविकसित मासपेशी कंपवात.) असणाऱ्या विद्यार्थ्यांचा विचार केला जाईल
- प्रस्तुत संशोधनात दिव्यांग व्यक्तीचा अधिकार-२०१६ याच्यातील दिव्यांगत्व प्रकारातील (११) अकरा प्रकाराचा विचार केला जाईल.
- प्रस्तुत संशोधनात दिव्यांगता विषयक साक्षरता संवर्धन कार्यक्रमाचे संवर्धन व त्याची परिणामकारकता यांच्याशी संबंधित असेल.
- प्रस्तुत संशोधनात स्वामी रामा नंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील पदवी व पदव्युतरस्तरावरील (कला,वाणिज्य,व विज्ञान) अभ्यासक्रमातील विध्यर्थाचाच विचार केला जाईल .

संशोधनाची मर्यादा :

- प्रस्तुत संशोधन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ पुरताच मर्यादित असेल.
- दिव्यांगता विषयक साक्षरता संवर्धना पुरतेच मर्यादित असेल .
- प्रस्तुत संशोधनात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील पदवी व पदव्युतरस्तरावरील (कला,वाणिज्य, व विज्ञान) अभ्यासक्रमातील विद्यार्थी पुरता मर्यादित असेल .
- दिव्यांग व्यक्तीचा अधिकार – २०१६ यातील (डोळ्यांना दिसणारे /सहजपणे लवकर लक्ष्यात येणारे उदा. अस्थिव्यंग,कर्णबधीर,अल्पदृष्टी,असिड-हल्ला,बुटकेपणा,वाचादोष,मानसिक आजार,बहुविकलांग,स्व:मग्नता, अविकसित मासपेशी कंपवात.) या ११ प्रकारा पुरताच मर्यादित असेल.
- प्रस्तुत संशोधन पीएच.डी. शिक्षणशास्त्र या विषय पुरता मर्यादित असेल.
- प्रस्तुत संशोधन हे शेक्षणिक वर्ष २०१९ -२०२३ या शैक्षणिक वर्षा पुरताच मर्यादित असेल.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनात मिश्र संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येईल.

सर्वेक्षण पद्धती ,प्रायोगिक पद्धती व व्यक्ती अभ्यास यामध्ये या पद्धतीचा एकात्मिक वापर करण्यात येईल.



संशोधनातील मुख्य उद्दिष्टानुसार संशोधन पद्धती

उद्दिष्ट.क्र.	संशोधन पद्धती	नमुना निवड पद्धती	माहिती संकलन साधने	माहिती विश्लेषण साधने	माहिती सादरीकरण साधने
उद्दिष्ट क्र.१ व २.	सर्वेक्षण पद्धती	सहेतुक पद्धती	प्रश्नावली, मुलाखत	शेकडेवारी	आलेख
उद्दिष्ट क्र.३व ४.	प्रायोगिक संशोधन पद्धती	सहेतुक पद्धती	स्व प्रमाणित चाचणी	शेकडेवारी	आलेख
उद्दिष्ट क्र.१.	व्यक्ती अभ्यास	सहेतुक पद्धती	प्रश्नावली	मध्यमान,प्रमाण विचलन,टी परीक्षिका.	आलेख

मिश्र संशोधन पद्धती :

ज्यामध्ये संशोधन एक किंवा बहुविध अभ्यासासाठी गुणात्मक व संख्यात्मक माहिती गोळा करतो व त्यांचे विश्लेषण आणि एकत्रीकरण करतो त्या पद्धतीस मिश्र संशोधन पद्धती म्हणतात.

१.सर्वेक्षण संशोधन पद्धती :

सर्वेक्षण संशोधन पद्धती ही वर्तमान काळाशी संबंधित असल्या कारणाने प्रस्तुत संशोधनात नांदेड जिल्ह्यातील पदवी व पदव्युतरस्तरावरील (कला,वाणिज्य, व विज्ञान) महाविद्यालय यातील विद्यार्थी शहरी व ग्रामीण भागातील कला,वाणिज्य, व विज्ञान यातील प्रत्येकी २५ विद्यार्थी निवड करून दिव्यांगता विषयक साक्षरते संबंधी संकल्पना ,समजुती ,विचार व आवश्यकता यांचा शोध तसेच दिव्यांगता विषयक साक्षरतेच्या स्तराचे निश्चितीकरण करण्यासाठी दिव्यांगता विषयक साक्षरता अभ्यास सर्वेक्षण पद्धतीने येईल.

२. प्रायोगिक संशोधन पद्धती :



प्रायोगिक संशोधन पद्धती ही भविष्यकाळाशी संबंधित असल्या कारणाने दिव्यांगता विषयक साक्षरता संवर्धनासाठी कार्यक्रमाचे विकसन व कार्यान्वयन करणे, दिव्यांगता विषयक साक्षरता संवर्धनासाठी लक्ष्य गट निश्चित व दिव्यांगता विषयक साक्षरता संवर्धनासाठी कार्यक्रमाचे घटक,आशय, संरचना निश्चित करून लक्ष्य गटानुसार दिव्यांगता विषयक साक्षरता संवर्धन कार्यक्रमाचे अंतिम प्रारूप ठरून समतुल्य गट निर्मिती करून नियंत्रित व प्रायोगिक गटात ५० विद्यार्थाची निवड करून उत्तर चाचणी घेण्यात येणार आहे. या पद्धतीने प्रायोगिक पद्धतीत अभ्यास करण्यात येईल .

प्रस्तुत संशोधनातील चले :

संख्यात्मक अथवा गुणात्मक मुल्यामुळे व्यक्त करता येऊ शकणारी कोणतीही संकल्पना यालाच चल म्हणतात.

१) स्वाश्रयी चल (स्वतंत्र चल) :

प्रयोगकार्त्याला ज्याचे परिणाम ठरवायचे असतात ,त्यांना स्वाश्रयी चल म्हणतात. प्रस्तुत संशोधनात दिव्यांगता विषयक साक्षरता संवर्धन कार्यक्रमाचे विकासनासाठी राबवविलेल्या कार्यक्रमाचे विकसन सर्व उपक्रम स्वाश्रयी चल आहेत.

२) आश्रयी चल (परतंत्र चल)

एखाद्या क्षमतेचा गृहीत परिणाम किंवा कारण म्हणजे आश्रयी चल होय. प्रस्तुत संशोधनात दिव्यांगता विषयक साक्षरता हे परतंत्र चल आहे.

संशोधन अभिकल्प :



प्रस्तुत संशोधनात संशोधकाने समतुल्य गट ,उत्तर चाचणी अभिकल्प घेण्यात येणार आहे. यात शहरी व ग्रामीण भागातील महाविद्यालयातील ५० विद्यार्थी प्रायोगिक व ५० विद्यार्थी नियंत्रित गटात संशोधन अभिकल्प निवडला जाईल .

३. व्यक्ती अभ्यास पद्धती :

एखाद्या सामाजिक घटकाचा सर्वसमावेशक अभ्यास म्हणजे व्यक्ती अभ्यास होय. तो सामाजिक घटक ,एखादी व्यक्ती असेल, एखादा गट असेल,एखादी सामाजिक संस्था असेल, एखादा जिल्हा असेल,किंवा एखादा समाज असेल याच आधारावर प्रस्तुत संशोधनात दिव्यांगता विषयक साक्षरते संबंधी संकल्पना ,समजुती ,विचार व आवश्यकता यांचा व दिव्यांगता विषयक साक्षरते च्या घटका संदर्भात परिणामकारकतेचे मूल्यमापन अभ्यासण्यासाठी पदवी व पदव्युतरस्तरावरील (कला,वाणिज्य, व विज्ञान) स्तरावरील नांदेड जिल्ह्यातील

शहरी भागातील ३ महाविद्यालय व ग्रामीण भागातील ३ महाविद्यालय यांचा अभ्यास व्यक्ती अभ्यास म्हणून करण्यात येईल.

संशोधनाची जनसंख्या :

संशोधनात संशोधकाने अभ्यासासाठीचा नमुना ज्यातून निवडला आहे. असे सर्व व्यक्ती म्हणजे जनसंख्या होय.

प्रस्तुत संशोधनामध्ये स्वामी रामानंद् तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, नांदेड जिल्ह्यातील पदवी व पदव्युत्तर (कला,वाणिज्य, व विज्ञान) अभ्यासक्रमातील प्रवेशित विद्यार्थी ही जनसंख्या असेल.

नमुना निवड:

शैक्षणिक संशोधनातून संपूर्ण जनसंख्येवर प्रयोग राबवविणे शक्य नसते .त्यामुळे जनसंख्येतून नमुना निवडणे आवश्यक असते.

संशोधन नमुना निवड :

नमुना गट :-

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने गैरसंभव्यता पद्धतीतील सहेतुक /कोठा/निर्दीष्ठांश या पद्धतीचा वापर केला जाईल.

सर्वेक्षण पद्धतीचा नमुना गट :

अ. क्र	नमुना गट	शहरी		ग्रामीण		एकूण
		स्त्री	पुरुष	स्त्री	पुरुष	
१	कला विद्यार्थी	२५	२५	२५	२५	१००
२	वाणिज्य विद्यार्थी	२५	२५	२५	२५	१००
३	विज्ञान विद्यार्थी	२५	२५	२५	२५	१००
४	एकूण	७५	७५	७५	७५	३००

प्रायोगिक पद्धतीचा नमुना गट

अ. क्र	नमुना गट	शहरी		ग्रामीण		एकूण
		स्त्री	पुरुष	स्त्री	पुरुष	
१	विद्यार्थी	२५	२५	२५	२५	१००
	एकूण	५०		५०		१००

व्यक्ती अभ्यासाचा नमुना गट

महाविद्यालयाचा प्रकार	शहरी	ग्रामीण	एकूण
संख्या	०३	०३	०६

व्यक्ती अभ्यासासाठी नमुना गट हा शहरी महाविद्यालय व ग्रामीण महाविद्यालय या भागातील प्रत्येकी तीन (०३) महाविद्यालयाची निवड केल्या जाईल.

संशोधनाची साधने :-

संशोधनाची अंतिम निष्कर्ष काढण्यासाठी आवश्यकती माहिती जमा / गोळा करण्यासाठी विविध प्रकारची माहिती व आकडेवारी आवश्यक असते. संशोधनासाठी आधार सामुग्री विश्वासार्ह व पारदर्शक / वैद्य असावी लागते. तिचे विश्लेषण करूनच संशोधक संशोधनाचे निष्कर्ष काढतो ,त्यासाठी निरीक्षणे करावी लागतात व गुणात्मक ,संख्यात्मक दोन्ही सामग्रीचा आधार घ्यावा लागतो हे आधार मिळवण्यासाठी विविध तंत्र व पद्धतीचा वापर केला जातो. त्यास संशोधनाची साधने म्हणतात.

प्रस्तुत संशोधनात दिव्यांगता विषयक साक्षरता श्रेणी प्रश्नावली व स्व: प्रमाणित चाचणीचा उपयोग केला जाईल.

अनु.क्र.	संशोधनाची उद्दिष्टे.क्र.	संशोधनाची साधने	प्रतिसादक गट
१.	उद्दिष्टे क्र.१ व २.	प्रश्नावली, मुलाखत	सर्वेक्षण पद्धती
२.	उद्दिष्टे क्र.३व ४.	स्व:प्रमाणित चाचणी	प्रायोगिक संशोधन पद्धती
३.	उद्दिष्ट क्र.१.	प्रश्नावली	व्यक्ती अभ्यास

कार्यक्रम विकसन:

दिव्यांगता विषयक साक्षरता संवर्धन कार्यक्रमाचे विकसन करत असताना दिव्यांगता विषयक माहिती, अधिकार ,प्रकार, लक्षणे, इत्यादी घटकाचा विचार केला जाणार आहे.

सांख्यिकीय परिणामे :

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक व अनुमानात्मक सांख्यिकीय तंत्राचा वापर केला जाईल . सांख्यिकीय विश्लेषणासाठी MS-excel, SPSS याचा उपयोग केला जाईल. व गुणात्मक माहितीचे विश्लेषण वर्णनात्मक पद्धतीने आशय विश्लेषण ,सारांकन. इत्यादी .द्वारे सदर केले जाईल.

संशोधन कार्यवाहीची रूपरेषा :

टप्पा क्र.	कार्यवाहीचे स्वरूप / टप्पे	संबंधित उद्दिष्टे
०१.	दिव्यांगत्व विषयक साक्षरता कार्यक्रम विषयक माहिती प्राप्त करून घेणे..	उद्दिष्ट ०१-०२
०२.	कार्यक्रम विकसन करणे.	०२
०३.	साधन विकसन व प्रमाणीकरण करून कार्यान्वयन करणे.	०३.
०४.	दिव्यांगत्व विषयक साक्षरता संवर्धनासाठी लक्ष्य गट निश्चिती करणे.	०३.
०५.	लक्ष्य गटानुसार अंतिम प्रारूपे तयार करणे.	०३.
०६.	दिव्यांगत्व विषयक साक्षरता कार्यक्रम विषयक माहिती प्राप्त करून घेऊन प्रश्नावली विद्यार्थ्या कडून भरून घेणे.	०३-०४
०७	दिव्यांगत्व विषयक साक्षरता कार्यक्रम विषयक माहिती प्राप्त करून ग्रामीण व शहरी भागातील ०३ महाविद्यालयाचा व्यक्ती अभ्यास करणे.	०३-०४
०८	दिव्यांगत्व विषयक साक्षरता कार्यक्रम विषयक माहिती प्राप्त करून ग्रामीण व शहरी भागातील महाविद्यालयातील ५०-५० विद्यार्थाचा प्रायोगिक पद्धतीने अभ्यास करणे.	०४
०९	दिव्यांगत्व विषयक साक्षरतेच्या संवर्धनासाठी संबंधित विविध घटक व चलाच्या संदर्भात मूल्यमापन करणे.	०४
१०.	निष्कर्ष व शिफारशी मांडणे.	

प्रकरण योजना

प्रकरण एक

संशोधन कार्य करीत असतांना नियोजन करणे हे अत्यंत महत्त्वाचे असते. संपूर्ण सशोधनाची ब्ल्यू प्रिन्ट म्हणून आरखडा मांडत असतो. प्रकरण एक मध्ये प्रस्तावनेतून भूमिका, संशोधन समस्या ,संशोधनाची गरज ,महत्व ,कार्यात्मक व संकल्पनात्मक व्याख्या ,संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची परीकल्पना , व्याप्ती मर्यादा ,थोडक्यात मांडण्यात येईल.

प्रकरण दोन

प्रकरण दोनमध्ये गत संशोधनाचा व संबंधित साहित्याचा व त्याची गरज ,विविध माध्यमातून संकलित केलेली साहित्य याचा आढावा जसे कि वर्तमान पत्र ,मासिक ,पुस्तकातील टिपणी , इत्यादी साहित्याचे परिशीलन करण्यात येईल .

प्रकरण तीन

प्रकरण तीन मध्ये संशोधनाच्या कार्य पद्धतीचा व कार्यवाही, जनसंख्या ,न्यादर्श, निवड संशोधन साधनेवर निर्मिती ,प्रत्यक्ष कार्यवाहीचा आढावा घेण्यात येईल .

प्रकरण चार

प्रकरण चार मध्ये माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात येईल .यात प्रश्नावली व मुलाखती द्वारे, प्रायोगिक पद्धतीतून प्राप्त माहितीचे निरीक्षण व अन्वयार्थ स्पष्ट करण्यात येईल. सदरील कार्य कोष्टक रकाने व परिच्छेदात मांडण्यात येईल.

प्रकरण पाच

प्रकरण पाचमध्ये माहितीच्या विश्लेषण व अर्थनिर्वचनातून निघालेले निष्कर्ष, शिफारशी व पुढील संशोधनासाठी विषय सुचविण्यात येतील.विद्यार्था कडून

प्रश्नावली,स्वः प्रमाणित चाचणी मापिका, यांच्या द्वारे प्राप्त झालेल्या माहिती व निरीक्षणाचे कार्य निर्वचनावरून निष्कर्ष काढण्यात येतील व पुढील संशोधनासाठी विषयक सुचविण्यात येतील व सारांश स्पष्ट करण्यात येतील.

संशोधक विद्यार्थी	मार्गदर्शक
भोसले उमेश सुदामराव	डॉ. जोशी महेश माधवराव
शिक्षणशास्त्र संकुल	सहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र संकुल
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ,नांदेड.	स्वा.रा.ती.म.विद्यापीठ,नांदेड.

संदर्भग्रंथ सूची मराठी

आगलावे प्रदीप (२०००),*संशोधन पद्धती व तंत्रे* ,नागपूर विद्या प्रकाशन.

करंदीकर, सुरेश (२००६)*शैक्षणिक मानसशास्त्र* सहावी आवृत्ती,कोल्हापूर,फडके प्रकाशन.

काळे प्रेमलत्ता,(१९९०)*अपवादात्मक बालकांचे मानसशास्त्र,* मुंबई, मँजेस्टीक प्रकाशन.

चिटणीस सु.भा.(२००६)*अपंग नव्हे अभंग मी,*गिरगाव मुंबई, परचुरे प्रकाशन.

चुडीवाला .बी.एफ.(अनुवाद) (१९९५), *अपंग व्यक्ती कायदा (समाज हक्काचे संरक्षण आणि सहभाग)*मुंबई, अधिनियम महाराष्ट्र शासन.

डॉ. सौ.नागसोडे किरण कृष्णाराव.(२००६)*अध्ययन कर्त्याचा विकास व अध्ययन अध्यापन क्रियांचे मानसशास्त्र,*प्रथम आवृत्ती, नागपूर, विद्या प्रकाशन.

दांडेकर वा. ना.(१९८९)*शैक्षणिक मापन व संख्याशास्त्र,* तिसरी आवृत्ती पुणे,श्री प्रकाशन .

पगार रविंद्र,(१९९४)*हात ना पसरू कधी ....* पुणे राजहंस प्रकाशन.

पाटील.ली,कुलकर्णी,वी.म.(१९७१)*आजचे शिक्षण आजच्या समस्या* ,पुणे,विद्या प्रकाशन.

पाटील ग.वी.(२००७)*भारतीय शिक्षण इतिहास आणि समस्या व कायदे,* प्रथम आवृत्ती, नाशिक चैतन्य प्रकाशन.

पंकज.एम.श्रीदेवी (अनुवाद),*दिव्यांग व्यक्तीचा अधिकार-२०१६* व्यवस्थापकीय संचालक -बेंगळूरू. सर्विस सेंटर.

भिताडे.वी.रा.(२००६)*शैक्षणिक संशोधन पद्धती,*पुणे नित्यनूतन प्रकाशन.

महाराष्ट्र शिक्षण परिषद ,(२००५) *अपंग समावेशित शिक्षण व शोधपत्रिका*,मुंबई, महाराष्ट्र शिक्षण परिषद.

महाराष्ट्र राज्य अपंग कल्याण(२००४) *अपंग कल्याण व पुनर्वसन विषयक योजना* ,मुंबई .

महाराष्ट्र शिक्षण परिषद (२०००) *प्रकाशित अपंग समावेशिक शिक्षण हस्त पुस्तिका,* मुंबई.

मुळे,उमाटे (१९९८)*शैक्षणिक संशोधनाची मुलतत्व*,तिसरी आवृत्ती ,औरंगाबाद ,विद्या प्रकाशन .

मोरे.व्हि.पा.(२०११) *अस्थिव्यंग अपंग विद्यार्थाच्या शैक्षणिक प्रगती मध्ये येणाऱ्या अडचणी एक चिकित्सक* : अभ्यास.,स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

समाज कल्याण विभाग ,महाराष्ट्र राज्य ,मंत्रालय(१९९०) *अपंगाचे शिक्षण प्रशिक्षण आणि पुर्नवसन सुविधा (शासन निर्णय सार संग्रह)* मुंबई ,महाराष्ट्र .समाज कल्याण विभाग.

सुषमा म्हसेकर (२०१३) *वाणी तालुक्यातील अपंग विद्यार्थ्याचा शेक्षणिक संयोजनाचा समस्याच अभ्यास.* स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

संदर्भग्रंथ सूची इंग्रजी :

Duyk.C., macferson king j. (2019) *Residential Immersive life Skill Program’s A Catalyst for Facilitating Emotional Literacy Development for Youth with Disabilities.*Toronto. Canada.

F. Rillotta P. Raghavendra and Thirumanickam, (2018) *Promoting inclusive and positive attitude of students with an intellectual disability*

through disabilities awarencess and incluvise physical education class. flinders university, Australia.

Jyoti, (2015) *Impact of an intervention programme based on disability related films and document in educating students about disabilities issues.* Kurukshetra university. Panjab.

J. Chalmond and R. Scelless. (2015) *The social interaction of children with down syndrome with peer a cross the early childwood.* Paris Nanterre university, France.

T.Lacon, N.Hyett. J. Spong,K.Bagley.(2014) *Development of a Reasonable Adjustment for Inclusive Education Rating Scale.*Austrialia university,Austrilia.

Sonam Banasal (2014) *Effect of collaborative Learning on Loneliness sense of coherence and classroom behavior among children with disability in inclusive and special school.*Panjab Univarsity, Chadigarh.

Victor john Cordeiro(2012) *Disability Challenges versus responses a sociological study on community based rehabilitation (CBR) on approach in Kanakapura taluka, karnatka.*University of Mysore, Karnatka.

Anu Prasannan (2012) *Implemetation of the united Nations conuention on disability : A case study of India.*jawaharlal university, New dehli**.**

Online journals.list:

१.https://www.tandfonline.com/toc/tied20/current

२.online international journals.

३.www.doaj.com

४.https://journals.sagepub.com/https://www.amarujala.com/columns/blog/international-disability-day-2019-theme-   and-challenges.

५.https://www.facebook.com/sadikShaikhParbhaniMaharashtraIndia/posts/2039430799621942/

६.https://www.youtube.com/results?search_query=satyamev+jayate+aamir+khan+disability

७.www.wikipedia.org.

८.www.onlinelearnersdictionaries.com

९.https://mhrd.gov.in/

१०.https://wecapable.com/disability-statistics-data-facts-india-infographic/

वेळापत्रक :-

अ.क्र	संशोधन कार्य	कालावधी (महिने)
1	नोंदणी	2 महिने
2	संशोधन समस्या अभ्यास	3 महिने
3	संबंधित साहित्याचा, संशोधनाचा आढावा	6 महिने
4	प्रश्नावली, प्रमाणित चाचण्या, मुलाखत सुची तयार करणे	5 महिने
5	माहितीचे संकलन करणे	6 महिने
6	माहितीचे अर्थनिवेचन	6 महिने
7	अहवाल लेखन	6 महिने
8	प्रबंधक सादरीकरण	6 महिने